**श्री. सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर**

**ता. बारामती, जि.पुणे**

**E-mail :** someshwarsakhar@gmail.com **दूरध्वनी क्रमांक** (०२११२) २८२१५,२८२४७६,२८२४७७

---

**जा.क्र./ऊस विकास /          / २०२२-२०२३**                                        **दिनांक:      -०९-२०२२**

# परिपत्रक

## अतिवृष्टी परिस्थितीत ऊस पिक व्यवस्थापन

आपले कारखान्याचे सर्व ऊस उत्पादक सभासदांना कळविण्यात येते की, कारखान्याच्या सन २०२२-२०२३ या वर्षीचा ऊस लागण हंगाम लागवड चालु आहे. आज अखेर या लागण हंगामात झालेल्या ऊस लागवडीचा आढावा घेतला असता अतिरिक्त पाऊस झाल्यामुळे तसेच जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टी व त्यामुळे निर्माण झालेली पुर परिस्थिती यामुळे ऊस पिकणाऱ्या भागांमध्ये काही दिवसापासुन ऊस क्षेत्रात पाणी साठलेमुळे ऊस पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असून नुकसान टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात.

**अतिवृष्टी परिस्थितीत ऊस पिकाचे नुकसान खालीलप्रमाणे होत आहे.**

१) जमिनीमध्ये प्राणवायुचे प्रमाण कमी झाल्यामुळे व जमिनीतील नत्र, स्फुरद व इतर अन्नद्रव्यांचे शोषण कमी होते त्यामुळे ऊसाची पाने पिवळसर होतात व वाढ खुंटते, मुळांची कार्यक्षमता घटते व त्यामुळे पिक जमिनीतील अन्नद्रव्ये व पाणी शोषुन घेऊ शकत नाही. उभ्या ऊसांस कांड्यांवर मुळ्या फुटतात, पर्ण छिद्रातुन होणारे बाष्पीभवन व कर्बग्रहण क्रिया मंदावते त्यामुळे ऊसाची वाढ खुंटते.

२) अतिवृष्टीमुळे ऊसाच्या शेंड्यात पाणी शिरल्यामुळे ऊसाचा वाढणारा कोंब कुजतो व ऊसास मुळ्या व पांगश्या फुटतात. नविन लागवडीत ७ दिवसांपेक्षा जास्त काळ पाणी राहिल्यास बहुसंख्य डोळे कुजल्याने उगवन फारच कमी होते.

३) ऊसामध्ये मर, मुळकुज, पाइनॅपल, पोक्काबोंग, तांबेरा व पानांवरील तपकिरी ठिपके या रोगांचा प्रादुर्भाव होतो.

४) लष्करी आळी, गोगलगाय, नाकतोडे, पांढरी माशी, कांडी व शेंडेकीड, पिठेकीड यासारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढतो.

५) ऊसाच्या उत्पन्नामध्ये ऊस वाढीच्या व साठलेल्या पाण्याच्या प्रमाणानुसार (कालावधीनुसार) आणि रोग व किडींच्या प्रादुर्भावानुसार कमी / अधिक प्रमाणात नुकसाण / घट होते.

६) शेतातील माती वाहुन जाणे व पाण्यातुन येणारी माती शेतात साचणे यामुळे जमिनीचे भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म बदलतात.

**• लक्षणे -**

१) पिकाच्या पोग्यात पाणी गेल्यामुळे पिकाची वाढ खुंटते व ऊस कुजतो पाण्यामुळे लोळलेल्या ऊसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

२) एक शेवडी ऊस तयार होतो.

**• सुधारणा करण्यासाठीच्या उपाय योजना -**

१) ऊस पुर्ण कुजला आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर शेतातील सर्व ऊस काढुन जाळून नष्ट करावा अथवा कंपोष्ट करावे व जमिनीची नांगरट करावी. पूर्व हंगामी / सुरू हंगामात पुन्हा लागवड करुन कांदा, हरभरा यासारखी आंतरपीके घ्यावीत.

२) ऊसातील पाण्याचा निचरा त्वरीत करावा. उताराच्या बाजुने चर काढावेत. गरज भासल्यास पंपाच्या सहाय्याने पाणी शेतीबाहेर काढावे.

३) शेतामध्ये काही ऊस वाळलेले किंवा कुजलेले असतील तर ते काढावेत. जुनी वाळलेली व कुजलेली पाने काढावीत.

४) एक शेवडी ऊसाची पाहणी करावी. फुटवे कमी प्रमाणात असतील तर जेठाकोंब काढुन युरीया ५० किलो प्रति एकरी प्रमाणे वाफश्याच्यावेळी विस्कटावा.